## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २८/२०१७-१८/३०१ दिनांक: १६.१०.२०१७

### आदेश
### आदेश केस क्र. २८/२०१७-२०१८

श्री महादेव चिल्लाप्पा गळवे
मु.पो. सिंगनहळ्ळी ता. जत
जि. सांगली

तक्रार
अर्जदार
(ग्राहक)

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

३) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय कवठे महांकाळ

४) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग जत

विरुध्द पक्षकार

**कोरम:-** १.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

### न्याय निर्णय

मी प्रदिप वि. खपली , सदस्य सचिव, ग्राहक तक्रार,निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे - न्याय निर्णय देत आहे.

## तक्रारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी

तक्रारदार श्री महादेव चिल्लाप्पा गळवे, राहणार सिंगनहळ्ळी ता. जत. जि. सांगली येथील असून त्यांचा विज ग्राहक क्र. २७०६२०००२६२१ आहे. त्यानी "महावितरण आपल्या दारी " योजने अतर्गत दि. ०८.११.२०१० साली पैसे भरुन विज कनेक्शन घेतले आहे. त्यांचे विज कनेक्शन हे ६०० फूट केबल टाकून देण्यात आले आहे व २ महिन्यात केबल ऐवजी आपणांस एल.टी. लाईनची खांब उभे करुन विज कनेक्शन देण्याचे सांगितले गेले. परंतु २०१७ पर्यन्त देखिल एल.टी लाईनचे काम केले गेले नाही. गेल्या ७ वर्षापासून लावलेले केबल आता खराब झाले आहे. तसेच तीन वेळा बदलावी लागली आहे.त्यामुळे विद्युत पुरवठा वारोवार खंडीत होत आहे व येणारे जाणारे लोकांना व जनावरे यांना ती तुटल्यास धोकादायक आहे.

त्यामुळे ३ पोलची एल.टी. लाईन टाकून त्यावरुन विद्युत पुरवठा देणे बाबतची त्यांची मागणी आहे. यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे यानी दि. १६.०५.२०१७ रोजी तक्रार दाखल केली व सांगली कक्षांने दि. १४.०७.२०१७ रोजी दिलेल्या आदेशाने समाधान न झाल्यामुळे दि. १७.०७.२०१७ रोजी त्यांनी मंचाकडे तक्रार दाखल केली.

सदर तक्रारीची सुनावणी दि. १२.१०.२०१७ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे घेण्यात आली. सुनावणी दरम्यान ग्राहक स्वत: व वि.प. तर्फे श्री स.ध. काळबांधे , उपकार्यकारी अभियंता जत उपविभाग उपस्थित होते.

## वितरण कंपनीची भूमिका

श्री स.ध. काळबांधे उपकार्यकारी अभियंता यांनी तिथे ०.१८ कि.मी. सिंगल फेज टू वायर एल.टी. लाईनचे काम असून त्यांचा जेष्ठता यादीमध्ये २० क्रमांक आहे या योजने अंतर्गत निधी उपलब्ध झालेवर जेष्ठता यादीनुसार त्यांचे एल.टी. लाईनचे काम करण्यात येईल असे सांगितले. वरील दोन्ही बाजूचे युक्तिवाद ऐकणेत आले व उपलब्ध कागदपत्राची पडताळणी करण्यात आली. वरील तक्रारीचे अनुषगाने या मंचासमोर खालील बाबी निर्माण होतात.

१) ग्राहकाला केबलच्या ऐवजी ०.१८ कि.मी. एल.टी. लाईन वरुन विद्युत पुरवठा देणे योग्य होईल काय?

उत्तर:- होय

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर:- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

ग्राहकाला ६०० फूट लांब असलेल्या केबलने ७ वर्षा पासून विज पुरवठा "महावितरण आपल्या दारी" या योजने अंतर्गत देण्यात आला आहे. साहजिकच ७ वर्षामध्ये केबल हा अनेक ठिकाणी खराब झाला असून तो तुटल्यास तेथील पादचा-याना व जनावरांना कधीही धोकादायक ठरु शकतो. या योजने अंतर्गत विद्युत पुरवठा घेतलेल्या सर्व ग्राहकापैकी, १ किंवा २ ग्राहक वगळता सर्व ग्राहकाचे एल.टी. लाईनचे काम पूर्ण झाले आहे व त्याबाबतची यादी देखिल ग्राहकाने सुनावणीचे दरम्यान मंचासमोर दाखल केली आहे. खराब झालेल्या केबलमुळे ग्राहकाला वारोवार विज पुरवठा खंडीत होण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. तसेच तेथील पादचारी व जनावरे यांना देखिल त्या पासून धोका उदभवण्याचा संभव नाकारता येत नाही.सबब मागणी प्रमाणे ग्राहकास त्वरीत एल.टी.लाईन वरुन विज पुरवठा चालू करुन द्यावा असे मंच सूचित करीत आहे. सुनावणी दरम्यान नुकसान भरपाई बद्दल ग्राहकाने कुठलाही प्रश्न उपस्थित केलेला नाही.

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KO... MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. महावितरण

**आदेश**

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे ०.१८ कि.मी. सिंगल फेज टू वायर लाईन टाकून १५ डिसेंबर-२०१७ पर्यन्त त्यावरुन विज पुरवठा देण्यात यावा.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक ०१.०७.२०१७ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे.

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

16/10
(प्र.वि. खपली)
सदस्य सचिव

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLH... MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. ... ONE
महावितरण